जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २४६ | गुरुवार, २ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER



## उरुळी कांचन येथे गांजा विक्री करणाऱ्या तरुणाला बेड्या

### पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांची धडक कारवाई

**उरुळी कांचन, ता. १ :** भरवस्तीतील एका वसाहतीत बेकायदेशीररीत्या गांजा बाळगून त्याची विक्री करणाऱ्या इसमावर उरुळी कांचन पोलिसांनी धाड टाकून त्याला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे १६ हजार २१४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशी माहिती उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी दिली.

हि कारवाई उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील तुपे वस्ती येथील ढमढेरे कॉलनीतील 'स्वयंभू सोसायटी'च्या चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ४०६ मध्ये करण्यात आली. फिरोज महमद शेख (वय ३०, सध्या रा. स्वयंभु सोसायटी प्लॅट नं. ४०६ ढमढेरे कॉलनी, उरुळी कांचन ता. हवेली जि. पुणे मुळ रा. कदमवाकवस्ती ता. हवेली जि. पुणे) असे अटक करण्यत आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई सुमित वाघ यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांना एका गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली होती की, तुपे वस्ती येथील ढम ढेरे कॉलनीतील 'स्वयंभू सोसायटी'च्या चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ४०६ मध्ये एक इसम गांजाची विक्री करत आहे. या माहितीची गांभीर्याने दखल घेत, उपविभागीय पोलीस अधिकारी (दौंड विभाग) यांची तोंडी मंजुरी घेऊन तात्काळ दोन सरकारी पंच, फोटोग्राफर आणि वजनकाटा मापारी यांच्यासह पथक तयार करण्यात आले. २३ फेब्रुवारीला रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास पोलीस पथकाने फ्लॅट नंबर ४०६ वर छापा टाकला. दरवाजा उघडल्यानंतर तिथे फिरोज शेख हा इसम मिळून आला. पोलिसांनी घराची झडती घेतली असता, किचनमधील मांडणीजवळ एका पिशवीत पांढऱ्या रंगाच्या २७ लहान पिशव्यांमध्ये हिरवट रंगाचा उग्र वासाचा गांजा मिळून आला. यावेळी ८७३ ग्रॅम वजनाचा गांजा व डिजिटल वजनकाटा असा १६ हजार २१४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# श्री काळभैरव अंबरनाथ यात्रेनिमित्त लोणी काळभोरमध्ये रंगणार कुस्तीचा महासंग्राम

### चार महाराष्ट्र केसरी, दोन उपमहाराष्ट्र केसरी, हिंद केसरींसह हरियाणातील नामवंत मल्ल एकमेकांना भिडणार, ३० लाखांच्या बक्षिसांची घोषणा

**लोणी काळभोर, ता. १ :** श्री काळभैरव अंबरनाथ यात्रेनिमित्त लोणी काळभोर येथे यंदा पारंपरिक सोहळ्यांसह कुस्तीचा जंगी आखाडा रंगणार असून राज्यातील तसेच उत्तर भारतातील नामांकित मल्ल शुक्रवार (ता. ३) रोजी ताकद आजमावणार आहेत. तब्बल ३० लाख रुपयांच्या बक्षिसांची घोषणा करण्यात आल्याने या कुस्ती स्पर्धेकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. यात्रेच्या पारंपरिक कार्यक्रमांमध्ये यंदा कुस्तीचा थरार हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. अशी श्री काळभैरव अंबरनाथ सर्व देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष हेमंत गायकवाड यांनी दिली.




लोणी काळभोर व कदम वाकवस्तीचे ग्रामदैवत श्रीमंत अंबरनाथ यांच्या वार्षिक यात्रेला गुरुवार (ता. २) व शुक्रवार (ता. ३) रोजी प्रारंभ होणार आहे. हनुमान जयंती निमित्त पहाटे चार वाजता श्रींच्या मूर्तीची महापूजा केली जाईल. त्यानंतर भाविकांकडून नैवेद्य अर्पण केला जाईल. रात्री छबिना, फटाक्यांची आतषबाजी तर पहाटे पारंपरिक तमाशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवारी पहाटे अंबरनाथ आणि जोगेश्वरी देवींचा विवाह सोहळा पार पडणार असून दुपारी तीन वाजता कुस्तीचा आखाडा रंगणार आहे.

या स्पर्धेतील सर्वाधिक चर्चेत असलेली आणि प्रतिष्ठेची लढत सिकंदर शेख आणि दादा शेळके यांच्यात रंगणार आहे. महाराष्ट्र केसरी किताब जिंकलेल्या या दोन्ही दिग्गज मल्लांमधील सामना पाहण्यासाठी कुस्तीप्रेमींची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या लढतीच्या विजेत्यास २ लाख २१ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. याचप्रमाणे दुसरी महत्त्वाची कुस्ती पृथ्वीराज मोहोळ आणि हरियाणातील दमदार मल्ल विक्रांत कुमार यांच्यात होणार आहे. या लढतीसाठी २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले असून राज्य विरुद्ध बाहेरील मल्ल असा रंगतदार सामना पाहायला मिळणार आहे.

या स्पर्धेत तिसऱ्या मानांकनासाठीही तीन वेगवेगळ्या कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवराज राक्षे विरुद्ध जसपाल सिंग, जयदीप पाटील विरुद्ध अमित कुमार, माऊली जमदाडे विरुद्ध प्रवीण कुमार, या तिन्ही लढतीतील विजेत्या पैलवानांना प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. महाराष्ट्र आणि हरियाणातील मल्ल आमनेसामने येणार असल्याने आखाड्यात चुरशीचे सामने रंगण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, या कुस्ती स्पर्धेतील आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी किताब जिंकणारे पैलवान हर्षवर्धन सदगीर यांचा लोणी काळभोर ग्राम स्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

या सत्कारा मुळे यात्रेतील कार्यक्रमांना अधिकच प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. या स्पर्धेचे निवेदन प्रसिद्ध कुस्ती समालोचक प्रशांत भागवत करणार असून त्यांच्या थेट आणि रोमहर्षक समालोचनामुळे प्रेक्षकांना प्रत्येक डाव, पलटवार आणि निर्णय अधिक जवळून अनुभवता येणार आहे.

#### यात्रा, परंपरा आणि कुस्तीचा अनोखा संगम

श्री काळभैरव अंबरनाथ यात्रेच्या धार्मिक वातावरणात पारंपरिक मातीतील कुस्तीचा समावेश झाल्याने लोणी काळभोर परिसरात सणासुदीचा उत्साह उसळला आहे. गावासह आसपासच्या भागातून हजारो कुस्तीप्रेमी उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील पारंपरिक खेळांना नवसंजीवनी मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

## खामगाव फाटा ते खामगाव रस्ता 'खड्डेमय'; वाहनचालकांचा जीव टांगणीला

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १ : दौंड तालुक्यातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या खामगाव फाटा ते खामगाव या मुख्य रस्त्याची सध्या दयनीय अवस्था झाली आहे. पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, प्रशासकीय दुर्लक्षामुळे प्रवाशांना शारीरिक व्याधी आणि अपघातांचा सामना करावा लागत आहे.



खामगाव फाटा ते खामगाव हा रस्ता केवळ स्थानिक वाहतुकीसाठीच नाही, तर पुरंदर, दौंड, शिरूर आणि हवेली या चार तालुक्यांना जोडणारा प्रमुख मार्ग म्हणून ओळखला जातो. रेल्वे क्रॉसिंग ओलांडून उत्तर बाजूला असलेल्या अनेक गावांतील शेतकरी आपल्या मालाची ने-आण करण्यासाठी याच रस्त्याचा वापर करतात. खामगाव, राहू, तांबेवाडी, उंडवडी, लडकतवाडी आणि पिंपळगाव परिसरातील नागरिक शेती, नोकरी आणि इतर कामांसाठी दररोज या मार्गावरून ये-जा करत असतात.


खामगाव परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शाळा असल्याने या रस्त्यावर सतत रहदारी असते. हडपसर, उरुळी कांचन आणि पुणे येथे शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी दररोज या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करतात. रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना कसरत करावी लागत असून, अनेकांना पाठीचे आजार जडले आहेत. तसेच, गंभीर रुग्णांना आरोग्य केंद्रात नेताना खड्ड्यांमुळे विलंब होत असल्याचे चित्र आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या साईड पट्ट्यांची देखील मोठी दुरवस्था झाली आहे. खड्डे चुकवताना वाहनचालकांचे नियंत्रण सुटून अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. या मार्गावर रेल्वे गेट असल्याने अनेकदा वाहतूक कोंडी होते, ज्यामुळे वाहनचालकांना इच्छित स्थळी पोहोचण्यास उशीर होतो आणि घाईघाईत अपघात घडतात. खामगाव-गाडामोडी मार्गे पुण्याकडे जाण्यासाठी हा सर्वात जवळचा मार्ग असल्याने या रस्त्याकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. या पार्श्व भूमीवर खालील मागण्या नागरिकांकडून केल्या जात आहेत.

खामगाव फाटा ते खामगाव या रस्त्याचे डांबरीकरण आणि खड्डे भरण्याचे काम तात्काळ सुरू व्हावे. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या साईड पट्ट्यांची दुरुस्ती करण्यात यावी. खामगाव फाटा येथील प्रलंबित रेल्वे उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. दरम्यान, रस्त्याच्या या दुरवस्थेमुळे प्रवासी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## मावळ–मुळशी–हवेलीच्या पर्यटनाला नवे पंख; ६७ कोटींचा विकास आराखडा मंजूर

**पुणे, ता. १ :** पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी आणि हवेली तालुक्यातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मोठा निर्णय घेतला आहे. या भागातील प्रमुख पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी सुमारे ६७ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. या कामांमुळे पर्यटनाला चालना मिळेल आणि पर्यटकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



या प्रकल्पांतर्गत रस्ते सुधारणा, पार्किंगची सोय, स्वच्छता आणि सुरक्षा यावर विशेष भर दिला जाणार आहे. खडकवासला धरण परिसरात सुमारे १ कोटी रुपये खर्चून चौपाटी विकसित केली जाणार आहे. तसेच पर्यटकांच्या सुरक्षेसाठी धरणाच्या कडेला संरक्षक कुंपण उभारले जाणार आहे. यामुळे गर्दी आणि अपघात टाळण्यास मदत होईल. गड-किल्ल्यांपर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्यांची सुधारणा केली जाणार आहे. राजमाची किल्ल्यासाठी १४ किमी रस्त्यासाठी १७ कोटी, लोहगड किल्ल्यासाठी ५.५० किमी रस्त्यासाठी ७ कोटी, तिकोना आणि पवना परिसरासाठी ६.५० किमी रस्त्यासाठी ८ कोटी, तर तुंग किल्ल्यासाठी ४ किमी रस्त्यासाठी ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

याशिवाय मुगाव ते ताम्हिणी घाट या मार्गासाठीही १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. लोणावळ्यात भविष्यात पर्यटकांसाठी स्कायवॉक उभारला जाणार असून तो मोठे आकर्षण ठरणार आहे. मुळशी तलाव परिसरात सुशोभीकरण आणि पार्किंगची व्यवस्था केली जाणार आहे. तसेच पळशे धबधबा परिसरात सुरक्षेसाठी जाळ्या आणि रेलिंग बसवले जाणार आहेत.

धार्मिक स्थळांचाही विकास करण्यात येणार असून त्यासाठी ४७ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. यात मंदिर परिसरात स्वच्छता, पिण्याचे पाणी, वाहनतळ आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. याशिवाय पर्यावरण संरक्षणासाठी खडकवासला आणि पवना धरण परिसरातील गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबवला जाणार आहे. यामुळे पाण्याचे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

## तक्रारवाडीत वीज बिल वसुली १०० टक्के; स्मार्ट मीटर बसविण्यातही यश

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १ : महावितरणच्या भिगवण शाखा कार्यालयांतर्गत असलेल्या तक्रारवाडी गावामध्ये वीज बिल वसुली मोहिमेला अभूतपूर्व यश मिळाले आहे. तंत्रज्ञ कुमारी गीतांजली कंठाळे यांनी दाखवलेली जिद्द आणि चोख नियोजनाच्या जोरावर या गावात १०० टक्के वीज बिल वसुली पूर्ण झाली असून, थकबाकीची यादी आता शून्यावर आली आहे.



केवळ वसुलीच नव्हे, तर तक्रारवाडी गावात अत्याधुनिक 'स्मार्ट मीटर' बसविण्याचे कामही पूर्ण क्षमतेने पार पडले आहे. तांत्रिक कर्मचारी आणि अधिकारी यांनी घराघरांत जाऊन नागरिकांना स्मार्ट मीटरचे महत्त्व पटवून दिले. यामुळे आता वीज वापराचे अचूक मोजमाप आणि पारदर्शक बिलिंग होण्यास मदत होणार असून भविष्यातील तांत्रिक अडचणीही दूर होणार आहेत.

या मोहिमेच्या यशात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले आहे. उपकार्यकारी अभियंता गलांडे आणि शाखा अभियंता भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. प्रधान तंत्रज्ञ राजेंद्र देहाडे आणि तंत्रज्ञ गीतांजली कंठाळे यांच्या प्रत्यक्ष नियोजनामुळे कामाला गती मिळाली. तसेच तक्रारवाडीतील वीज ग्राहकांनी स्वतःहून वेळेवर बिले भरून प्रशासनाला सकारात्मक प्रतिसाद दिला, हे या यशाचे मुख्य सूत्र ठरले आहे.

दरम्यान, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील उत्तम समन्वयाचे हे उदाहरण मानले जात आहे. या यशामुळे भिगवण शाखेच्या कार्यपद्धतीला नवे बळ मिळाले असून, भविष्यातही इतर गावांमध्ये अशाच प्रकारे १०० टक्के वसुली आणि तांत्रिक सुधारणांचा वेग कायम ठेवण्याचा निर्धार अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## गॅस टंचाई की अफवा? शहरी–ग्रामीण भेदामुळे हजारो ग्राहक त्रस्त

### लोणी काळभोर परिसरातील ग्राहक संतप्त

**लोणी काळभोर, ता. १ :** आंतरराष्ट्रीय युद्धस्थिती आणि सोशल मीडियावरील अफवांच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला असून शहरी आणि ग्रामीण भागातील वेगवेगळ्या नियमांमुळे लोणी काळभोर परिसरातील हजारो ग्राहकांना त्रास सहन करावा लागत आहे. सध्या शहरी भागात गॅस सिलिंडर पुन्हा बुक करण्यासाठी किमान २५ दिवसांची, तर ग्रामीण भागात ४५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागत असल्याने पूर्व हवेलीतील नागरिकांच्या अडचणीत भर पडली आहे.




शेवाळवाडी आणि मांजरी बुद्रुक ही दोन्ही गावे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट असतानाही येथील गॅस पुरवठा लोणी काळभोर येथील पाषाणकर गॅस एजन्सीमार्फत होत असून ती ग्रामीण श्रेणीत येते. त्यामुळे या गावांतील ग्राहकांना शहरी भागातील सुविधा न मिळता ग्रामीण नियम लागू होत आहेत. या विसंगतीमुळे हजारो कुटुंबांना गॅस सिलिंडरसाठी ४५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे, तर शहरातील ग्राहकांना तुलनेने लवकर सिलिंडर मिळत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

#### व्यावसायिक गॅस वितरण ठप्प; हॉटेल व्यवसाय धोक्यात

व्यावसायिक गॅस सिलिंडरचे वितरण सुरळीत नसल्याने परिसरातील हॉटेल आणि खानावळींचा व्यवसाय अक्षरशः डळमळीत झाला आहे. अनेक व्यावसायिकांना पर्यायी इंधनाचा वापर करावा लागत असून खर्चात मोठी वाढ झाली आहे. राज्यातील इतर शहरांमध्येही हॉटेल व्यवसायिकांना व्यावसायिक गॅस मिळण्यात अडचणी येत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

#### शहरासारखीच गॅस सेवा द्या

परिसरातील नागरिकांनी शासन व तेल कंपन्यांकडे मागणी केली आहे की, महानगरपालिकेत समाविष्ट गावांना शहरी श्रेणी लागू करावी, गॅस बुकिंगचा कालावधी कमी करावा, व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा नियमित करावा, अन्यथा पुढील काही दिवसांत नागरिकांकडून आंदोलनही होऊ शकते.

#### लोकसंख्या लाखावर; तरीही शहरी सुविधा नाहीत

लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या दोन्ही भागांची लोकसंख्या मिळून एक लाखांहून अधिक आहे. शिवाय लोणी काळभोर पोलीस ठाणे पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीत येते. त्यामुळे नागरिकांचा सवाल आहे पोलीस, प्रशासन शहरी; पण गॅस सेवा ग्रामीण का?

## संक्षिप्त

### व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात वाढ

**मुंबई, ता. १ :** नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सरकारी पेट्रोलियम कंपन्यांनी १९ किलो वजनाचा एलजीपी सिलिंडरच्या किंमतीमध्ये ३१० रूपयांची वाढ केली आहे. सलग चौथ्या महिन्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात वाढ झाल्याने हॉटेल-रेस्टॉरंटमधील जेवण महागण्याची चिन्हे आहेत. आधीच गॅस टचांईने त्रस्त नागरिकांना आता दरवाढीचा फटकाही बसणार आहे. दरम्यान, घरगुती एलपीजी सिलिंडर आणि विमान इंधनाच्या म्हणजेच एटीएफच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही.महिनाभरापासून इराण-इस्त्रायल यांच्यामध्ये युद्ध सुरू आहे, त्यामुळे जगभरात महागाईचा भडका वाढलेला आहे. त्यातच आता १९ किलो वजनाच्या एलपीजी सिलिंडरच्या दरात पुन्हा एकदा मोठी वाढ झालीय.

### अमेरिकेला चार देशांकडून धक्का

**नवी दिल्ली, ता. १ :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना सहयोगी देशांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्यानं ते नाराज झालेत. डोनाल्ड ट्रम्प एकीकडे इराणवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत असताना त्यांना सहयोगी देशांकडून सहकार्य मिळत नाहीये. युरोपियन देशांनी इराणविरुद्धच्या युद्धात थेट सहभागी होण्यापासून दूर राहणं पसंत केलंय. याशिवाय काही देशांनी अमेरिकेला हवाई हद्द वापरण्यास नकार दिलाय. फ्रान्स, इटली, स्पेन आणि स्वित्झरलँड या सारख्या देशांनी अमेरिकन लष्करी विमानांना हवाई एअरस्पेस वापरण्यास मनाई केलीय. यामुळं अमेरिकेच्या रणनीतीवर परिणाम होत असून यामुळं डोनाल्ड ट्रम्प यांची नाराजी वाढल्याचे संगणयत येतंय.

### इराणने ट्रम्पसह जगाची झोप उडवली

**नवी दिल्ली, ता. १ :** अमेरिकेने इराणमधील इस्फाहान शहरातील एका मोठ्या बंकर-बस्टर बॉम्बनं हल्ला केला. त्यानंतर आता इराणने अमेरिकेला हादरवणारी धमकी दिली आहे. इराणच्या या धमकीमुळे डोनाल्ड ट्रम्पसह जगाला धडकी भरलीय. आखाती प्रदेशातील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले केल्यानंतर, आता इराण अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्यांना लक्ष्य करण्याची योजना आखत आहे. काल इराणी रिव्होल्युशनरी गार्ड्सने १८ अमेरिकन कंपन्यांवर संभाव्य हल्ल्यांबाबत इशारा दिला. या यादीत गुगल आणि मायक्रोसॉफ्टचाही समावेश आहे. इराणकडून आलेल्या या धमकीमुळे आता कॉर्पोरेट आस्थापनेही असुरक्षित बनलेत. भविष्यात जर कोणत्याही इराणी नेत्याची हत्या झाली, तर ते आखाती देशांमध्ये स्थित अमेरिकन कंपन्यांना लक्ष्य करतील असे म्हणत इराणने अमेरिकेला धमकी दिलीय.

### आयएएस तुकाराम मुंढे यांची पुन्हा बदली

**मुंबई, ता. १ :** राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांच्या पुन्हा बदल्या करण्यात आल्या. १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून यामध्ये नेहमी चर्चेत राहणाऱ्या तुकाराम मुंढे यांचा देखील समावेश आहे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची २१ वर्षांच्या कार्यकाळात तब्बल २५ वेळा बदली करण्यात आली आहे. त्यांची दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदावरून थेट आता त्यांची बदली मंत्रालयातील महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागात करण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे तुकाराम मुंढे यांच्यावर महसूल आणि वन विभाग या महत्वाच्या खात्यांची जबाबदारी देखील सोपवण्यात आली आहे. तुकाराम मुंढे हे राज्यातील सर्वात जास्त चर्चेत राहिलेले आयएएस अधिकारी आहेत. राज्यभरात अनेक ठिकाणी त्यांच्या बदली करण्यात आल्या आहेत. त्यांनी अनेक कामचुकार आणि शिस्तीचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे.

### खरातची पत्नी फरार, मुलगा पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक, ता. १ :** भोंदू अशोक खरात प्रकरणात पोलिसांनी कारवाईचा धडाका लावलाय. एकीकडे पोलिसांच्य विशेष तपास पथकाकडून अशोक खरातची कसून चौकशी सुरू आहे. चौकशीत त्याने कोट्यवधींची कमाई कशी कमावली, याचा शोध सुरू आहे. महिलांचं लैंगिक शोषण करणाऱ्या खरातच्या विरोधात १० हून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. त्याच्या पत्नीच्या विरोधातही फसवणूक प्रकरणी शिर्डी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. तर पोलीस थेट खरातच्या नाशिकच्या बंगल्यात शिरले. त्यावेळी पोलिसांनी खरातच्या मुलाला ताब्यात घेतलं.त्यानुसार आता खरातची त्याच्या मुलासाच्या समोरच चौकशी करण्यात येणार असल्याच म्हटलं जातंय.

### सुनेत्रा पवारांविरोधात ३ जण लढणार

**बारामती, ता. १ :** अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर बारामती पोटनिवडणुकीची घोषणा झाली आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या बारामतीमधून निवडणूक लढणार, हे जवळपास निश्चित झालेय. पण आता त्यांच्याविरोधात ३ जणांनी पहिल्याच दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पण हे तिन्ही उमेदवार बारामती मतदारसंघातील नाहीत. जत, सातारा आणि सोलापूर या ठिकाणातील उमेदवार असल्याची माहिती मिळाली. पण पहिल्याच दिवशी ३ अर्ज आल्यामुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे. अर्ज मागे घेण्याच्या दिवसांपर्यंत आता कोण कोण मैदानात असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागलेय.

# शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली सायबर चोरट्यांनी महिलेला घातला अडीच लाखांचा गंडा

**फुरसुंगी, ता. १ :** सोशल मीडियाच्या माध्यमातून जलद नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवणाऱ्या सायबर चोरट्यांनी फुरसुंगी (ता. हवेली) परिसरातील एका महिलेची तब्बल २ लाख ५६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. टेलिग्राम ॲपवरील बनावट ट्रेडिंग ग्रुपच्या माध्यमातून हा प्रकार घडला असून, या प्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विना विकास गवळी (वय ४३,सिग्मा सेंच्युरिया,फुरसुंगी, ता. हवेली) अशी फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विना गवळी या विमा क्षेत्रात कार्यरत असून त्या ऑनलाईन बँकिंगचा नियमित वापर करतात. त्यांच्या मोबाईलवर टेलिग्राम ॲपवर शेअर ट्रेडिंगशी संबंधित जाहिरात दिसल्यानंतर त्यांनी संबंधित लिंकवर क्लिक केले आणि त्यांना ५०००vipttask३३३ या नावाच्या ग्रुपमध्ये ॲड करण्यात आले.

ग्रुपमध्ये सामील झाल्यानंतर ख्रिस्टा नावाच्या ॲडमिनकडून दररोज शेअर बाजारातील ट्रेडिंगबाबत मार्गदर्शन दिले जात होते. इतर सदस्यांना मोठा नफा झाल्याचे स्क्रीनशॉट सतत पोस्ट करून विश्वास निर्माण करण्यात आला. सुरुवातीला कमी रकमेची गुंतवणूक करून नफा झाल्याचे दाखवल्याने गवळी यांचा या ग्रुपवरील विश्वास वाढला.




१ ते ३ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आरोपींच्या सांगण्यावरून गवळी यांनी विविध बँक खात्यांमध्ये युपीआय व आयएमपीएसच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने पैसे पाठवले. या व्यवहारांमध्ये कोटक महिंद्रा बँक, इंडियन पोस्ट पेमेंट्स बँक, बँक ऑफ बडोदा, नॉर्थ ईस्ट स्मॉल फायनान्स बँक, युको बँक, पंजाब नॅशनल बँक व कॅनरा बँक अशा अनेक बँक खात्यांचा वापर करण्यात आला. एकूण १२ व्यवहारांद्वारे २, लाख ५६ हजार रुपये आरोपींच्या खात्यांमध्ये जमा करण्यात आले.

या बदल्यात टेलिग्राम ग्रुपवर त्यांच्या खात्यात ३.५ लाख रुपये नफा जमा झाल्याचे बनावट आकडे दाखवण्यात आले. गुंतवलेली रक्कम आणि दाखवलेला नफा काढण्याचा प्रयत्न केल्यावर आरोपींकडून आणखी २ लाख ५० हजार रुपये जमा केल्यासच सर्व रक्कम मिळेल, असे सांगण्यात आले. यानंतर आपली फसवणूक झाल्याची खात्री झाल्याने गवळी यांनी तातडीने राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर आणि नंतर सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

त्यानुसार फुरसुंगी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(ड) तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३(५),३१८(४),३१९(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून संबंधित बँक खाती, मोबाईल क्रमांक आणि टेलिग्राम आयडींचा तपास सुरू असून या रॅकेटमागील सूत्रधारांचा शोध घेतला जात आहे.

### खेडमध्ये दोन भोंदू बाबांची धुलाई

**पुणे, ता. १ :** नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात याचे अश्लील कृत्य उघडकीस आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट आहे. या प्रकरणाचे पडसाद आता पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात उमटल्याचे पाहायला मिळत आहे. धर्माच्या नावाखाली सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या दोन भोंदू बाबांना एका वृद्ध आजोबांनी भररस्त्यात चांगलाच धडा शिकवला आहे. आजोबांनी या भोंदू महाराजांना काठीने चोप दिल्याची घटना समोर आली असून, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना खेड तालुक्यातील पाईट-सावंतवाडी परिसरात घडली आहे. येथे काही फिरस्ते बाबा फिरत असताना त्यांनी एका महिलेला आपल्या जाळ्यात ओढले. घरातील बाधा दूर करणे किंवा भविष्य सांगण्याच्या बहाण्याने या भोंदू बाबांनी त्या महिलेकडून ५००० रुपयांची मागणी केली आणि तिची आर्थिक फसवणूक केली.

# सापडलेले पाकीट सहाय्यक फौजदार रामदास मेमाणे यांनी दिले मूळ मालकाला परत

**लोणी काळभोर, ता. १ :** कर्तव्यावर जात असताना सापडलेले पाकीट स्वतःजवळ न ठेवता प्रामाणिकपणे त्याचा शोध घेऊन मालकाच्या स्वाधीन करणाऱ्या सहाय्यक पोलीस फौजदारांच्या प्रामाणिकतेचे उदाहरण सोमवारी (ता. ३०) समोर आले. चंदननगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस फौजदार रामदास मेमाणे यांनी दाखविलेल्या या सचोटीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३० मार्च २०२६ रोजी सकाळी कर्तव्यावर हजर होण्यासाठी जात असताना तुपे कॉर्नर, अमनोरा, हडपसर परिसरात एका दुचाकीस्वाराच्या पॅन्टच्या मागील खिशातून पाकीट रस्त्यावर



पडल्याचे मेमाणे यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ आपले वाहन थांबवून पाकीट उचलले व संबंधित व्यक्तीचा पाठलाग केला; मात्र गर्दीत तो दुचाकीस्वार दिसेनासा झाला.

यानंतर मेमाणे यांनी पाकीट चंदननगर पोलीस ठाण्यात आणून तपासणी केली असता त्यामध्ये ७६० रुपये रोख रक्कम, विविध बँकांची क्रेडिट-डेबिट कार्डे, वाहनाचे आरसी बुक आणि ड्रायव्हिंग लायसन्स आढळून आले. कागदपत्रांवरून मालकाचा पत्ता भंडारा जिल्ह्यातील असल्याचे समजले; मात्र संपर्क क्रमांक नव्हता. त्यानंतर त्यांनी वाहनाच्या आरसी बुकवरील क्रमांकाच्या आधारे क्राईम नाकाबंदी ॲपमध्ये माहिती टाकून वाहनधारकाचा मोबाईल क्रमांक मिळवला आणि त्याच्याशी संपर्क साधला. फोनवर पाकीट हरवल्याची खात्री झाल्यानंतर संबंधित व्यक्तीस चंदननगर पोलीस ठाण्यात येण्यास सांगण्यात आले. थोड्याच वेळात वेदांत माधव रामेकर, व्यवसाय जॉन डिअर कंपनीतील अभियंता, रा. साडेसतरा नळी, हडपसर हे पोलीस ठाण्यात दाखल झाले. आवश्यक पडताळणीनंतर पाकिटातील सर्व रक्कम व कागदपत्रे त्यांच्या ताब्यात देण्यात आली. या घटनेमुळे पोलीस दलातील प्रामाणिकपणा व जबाबदारीची भावना पुन्हा अधोरेखित झाली असून, सहाय्यक पोलीस फौजदार रामदास मेमाणे यांच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक व्यक्त होत आहे.

### बोरीभडक येथे मजुराला तिघांकडून बेदम मारहाण

**यवत, ता. १ :** मजुरीचे केवळ १०० रुपये मागितल्याच्या रागातून तीन जणांनी मिळून एका २८ वर्षीय तरुणाला अश्लील शिवीगाळ करत लाकडी काठीने डोक्यात मारून जखमी केले आहे. ही घटना सोमवारी (ता. ३०) सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास बोरीभडक (ता. दौंड) गावच्या हद्दीत घडली.

दीपक तुकाराम मिसाळ (वय -२८, रा. बोरीभडक) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर सर्जेराव घोरपडे, ऋतिक सर्जेराव घोरपडे आणि प्रदीप रावसाहेब घोरपडे (सर्व रा. बोरीभडक) असे मारहाण करणाऱ्या तिघांची नावे आहेत. दीपक मिसाळ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तिघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दीपक मिसाळ हे मजुरीचे काम करतात. त्यांनी आरोपी प्रदीप घोरपडे यांच्या वडिलांकडे आपल्या कामाचे थकीत असलेले १०० रुपये मागितले होते. स्वतःच्या हक्काचे पैसे मागितल्याचा राग मनात धरून आरोपींनी दीपक यांना गाठले आणि वाद घालण्यास सुरुवात केली.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपी सर्जेराव घोरपडे, ऋतिक सर्जेराव घोरपडे आणि प्रदीप रावसाहेब घोरपडे यांनी दीपक यांना घेराव घालून लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी आरोपी सर्जेराव घोरपडे याने हातातील लाकडी काठीने दीपक यांच्या डोक्यात जोरात प्रहार केला. या हल्ल्यात दीपक यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून ते जखमी झाले आहेत.

# जिल्हा बँकेत पीक कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी

पोपट पाचंगे

रांजणगाव गणपती, ता. ०१ : मार्च महिन्याचा आज अखेरचा दिवस असल्याने शिरुर तालुक्यातील सभासद शेतकऱ्यांमध्ये पीक कर्ज भरण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांमध्ये शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे पहायला मिळत आहे. ३१ मार्च पूर्वी कर्जाची परतफेड केल्यास शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळतो, म्हूणन सभासद शेतकरी इकडून तिकडे पैशांची जुळवाजुळव करत बँकाकडे धाव घेताना दिसून आले.

पुणे जिल्हा बँकेमार्फत शेतकऱ्यांना थेट गावागावात सेवा पुरवली जात आहे.ग्रामीण भागातील बहुतेक नागरिकांची खाती याच बँकेत असल्यामुळे आणि अतिशय सोप्या



प्रक्रियेमुळे या बँकाकडे शेतकरी प्राधान्य देतात. सेवा सहकारी संस्थामार्फत बँकेची सेवा गावागावात पोहोचली आहे. शेतकऱ्यांना सध्या बचत गटापेक्षा पीक कर्ज अधिक फायदेशीर ठरत आहे.

सभासद शेतकरी एप्रिल महिन्यात नवीन कर्ज उचलतात आणि पुढील वर्षी मार्च महिन्यात या कर्जाची परतफेड करतात. या पीक कर्जाचा फायदा म्हणजे व्याजमुक्त कर्ज मिळणे आणि आर्थिक भार कमी होणे असल्याने दिवसेंदिवस पीक कर्ज घेण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. ३१ मार्चपूर्वी कर्जाची परतफेड केल्यास कोणतेही व्याज आकारले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी फक्त मूळ रक्कम भरावी, ज्यामुळे व्याजाचा ताण टाळता येतो आणि नवीन कर्जही लवकर उपलब्ध केले जात असल्याची माहिती जिल्हा सहकारी बँकेच्या रांजणगाव गणपती शाखेचे शाखा प्रमुख विकास नवले यांनी दिली.

# यवतमध्ये फोटो व्हायरल करण्याची धमकी देणाऱ्या आरोपीसह पाच जणांवर गुन्हा दाखल

राहुलकुमार अवचट

यवत, ता. १: अल्पवयीन मुलीचा वारंवार पाठलाग करून तिचा विनयभंग करून 'तुझे खानदान संपवून टाकीन' म्हणत नातेवाईकांनाही जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ५ जणांवर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका १७ वर्षाच्या अल्पवयीन मुलीने यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पीडित अल्पवयीन मुलीने दिलेल्या तक्रारीनुसार मुख्य आरोपी अविनाश बाळू लकडे (ता. यवत, ता. दौंड) याच्यासह इतर चार जणांविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२५ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत आरोपी अविनाश बाळू लकडे (रा. यवत) याने फिर्यादी अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही तिचा वारंवार पाठलाग केला. आरोपीने तिला गाठून जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न केला, तिचा हात धरून तिला अंगावर ओढून घेतले आणि तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. एवढेच नव्हे तर, स्वतःच्या मोबाईलमधील तिचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला वारंवार मानसिक त्रास दिला.

या गंभीर प्रकरणात एका महिला आरोपीचाही समावेश असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तू अविनाशबरोबर बोलत जा, नाहीतर तो खूप डेंजर आहे, असे म्हणून संबंधित महिलेने पीडितेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. आरोपींच्या या सततच्या त्रासामुळे पीडित मुलगी प्रचंड दहशतीखाली होती.

पीडितेने घडलेला प्रकार आपल्या नातेवाईकांना सांगितल्यानंतर, सर्वजण आरोपींना विचारणा करण्यासाठी गेले होते. यावेळी आरोपींनी सुधारण्याऐवजी पीडितेसह तिच्या नातेवाईकांना आणि साक्षीदारांना अश्लील शिवीगाळ केली.

तुझे खानदान संपवून टाकीन, अशी धमकी देत आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे पोलीस तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी यवत पोलिसांनी मुख्य आरोपी अविनाश लकडे आणि इतर चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक मेतलवाड करीत आहेत.

# उरुळी कांचनमध्ये घरफोडीचा डाव उधळला; एकाला अटक, एक जण फरार

**उरुळी कांचन, ता. १ :** परिसरातील तुपे वस्ती परिसरात घरफोडी किंवा चोरी करण्याच्या उद्देशाने शस्त्रांसह दबा धरून बसलेल्या एका सराईत गुन्हेगाराला उरुळी कांचन पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. तर एकजण अंधाराचा फायदा घेऊन फरार झाला. ही कारवाई शुक्रवारी (ता. २०) पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

विशाल कैलास साबळे (रा. तुपे वस्ती, उरुळी कांचन, ता. हवेली) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर सनी अगरवाल (पूर्ण नाव माहिती नाही) रा, तुपे वस्ती, उरुळी कांचन) असे फरार झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल शरद चव्हाण यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (ता. २०) पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास



उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल शरद चव्हाण व सहाय्यक फौजदार दाभाडे हे सरकारी वाहनातून रात्रगस्त घालत होते. यावेळी साखरे पेट्रोल पंप आणि सदानंद बेकरीच्या पाठीमागे तुपे वस्ती रोडवर दोन संशयित इसम तोंडाला काळा रुमाल बांधून गोल्डन रंगाच्या क्टिव्हा गाडीसह अंधारात थांबल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

पोलिसांनी गाडी थांबवून चौकशीसाठी निघाले असता दोन्ही आरोपींनी मोटारसायकलवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क पोलिसांनी पाठलाग करून एकाला ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव विशाल साबळे असे असल्याचे सांगीतले. तर त्याचा साथीदार सनी अगरवाल हा मात्र अंधारात पळून जाण्यात यशस्वी झाला. अटक करण्यात आलेल्या विशाल साबळे याच्याकडे घरफोडीसाठी लागणारे लोखंडी कटावणी, धारदार स्क्रू ड्रायव्हर, काळा रुमाल (चेहरा लपवण्यासाठी वापरलेला), गोल्डन रंगाची क्टिव्हा या गाडीला पुढे किंवा मागे नंबर प्लेट नव्हती. अशा शस्त्रांसह थांबण्याबाबत विचारले असता, आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. तो घरफोडी करण्याच्याच उद्देशाने तिथे थांबल्याची खात्री पटल्याने पोलिसांनी त्याला अटक केली.

दरम्यान, याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल शरद चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विशाल साबळे आणि पळून गेलेला सनी अगरवाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार चोरमले करत आहेत.

# दिवे घाटातील अपघातात बाप-लेकीचा मृत्यू; मुलगा गंभीर जखमी

## खंडोबा दर्शनावरून परतताना काळाचा घाला

### देवदर्शनाचा प्रवास ठरला शेवटचा

खंडोबा देवदर्शन करून आनंदात घरी परतत असताना काही क्षणांतच कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. एका क्षणात वडील आणि मुलगी कायमचे दुरावल्याने संपूर्ण कुटुंब शोकसागरात बुडाले आहे. तर जखमी सोहम याच्या प्रकृतीकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

**फुरसुंगी, ता. १ :** जेजुरी येथील खंडोबा देवदर्शन करून परतत असलेल्या एका कुटुंबावर दिवेघाटात काळाने घाला घातला. भरधाव ट्रकने दुचाकीला पाठीमागून दिलेल्या जोरदार धडकेत वडील आणि त्यांच्या १२ वर्षांच्या मुलीचा जागीच मृत्यू झाला, तर ८ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात ३० मार्चला रात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास घडला आहे. तर या हृदयद्रावक अपघाताने परिसरात शोककळा पसरली आहे.

सुंदर कैलास गंगावणे (वय-३८) मुलगी अनन्या गंगावणे (वय १२, रा.-उंड्री-पिसोळी कात्रज-कोंढवा रोड पुणे) अशी मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. तर मुलगा सोहम गंगावणे (वय-०८) हा गंभीर जखमी आहे. याप्रकरणी अश्विनी पवार यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ट्रक चालक हनुमंत बाबुराव मलकापुरे (वय ३२, रा. नागेवाडी, जि. लातूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुंदर गंगावणे हे त्यांची मुलगी अनन्या व मुलगा सोहम यांना घेऊन २९ मार्च रोजी दुचाकीवरून जेजुरी येथे खंडोबा देवदर्शनासाठी गेले होते. देवदर्शन करून मध्यरात्रीनंतर ते उंड्री येथील घरी परतत असताना हा अपघात घडला. पुणे-सासवड मार्गावरील दिवेघाट उतारावरून दुचाकी खाली उतरत असताना, सासवडकडून पुण्याकडे येणाऱ्या अशोक लेलँड ट्रकने भरधाव वेगात दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर फेकले गेले.

या धडकेत सुंदर गंगावणे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर मुलगी अनन्या ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. मुलगा सोहम हा गंभीर जखमी अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडला होता. अपघातानंतर घटनास्थळी जमा झालेल्या नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. जखमी सोहमला तातडीने ससून सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

दरम्यान, पोलीस व खाजगी रुग्णवाहिकेच्या मदतीने सुंदर गंगावणे आणि अनन्या यांना ससून रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून दोघांनाही मृत घोषित केले. मृतदेहांचे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी कमांड रुग्णालय, वानवडी येथे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर कुटुंबीयांच्या ताब्यात मृतदेह सुपूर्द करण्यात आले. या घटनेने गंगावणे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

या प्रकरणी अश्विनी पवार यांनी ट्रक चालक हनुमंत मलकापुरे याच्याविरुद्ध फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपीच्या विरोध निष्काळजी व बेदरकार वाहन चालविल्याप्रकरणी मोटरवाहन अधिनियम, १९८८ - ११९, १७७, १८४ ; भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ - १०६ (१), १२५ (ल), २८१ प्रमाणे चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केडगाव ग्रामपंचायतसमोर एकाला मारहाण; यवत पोलिसांत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल




**यवत, ता. १ :** तू माझ्याकडे का बघतोस? मला शिव्या का देतोस? अशा शुल्लक कारणावरून केडगाव ग्रामपंचायत कार्यालया समोर एका २७ वर्षीय तरुणाला तिघांनी मिळून मारहाण केली. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्यात दगडाने प्रहार करण्यात आला असून तो गंभीर जखमी झाला आहे. ही घटना शुक्रवारी (ता. २७) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास केडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर घडली.

वैभव महादेव देशमुख (वय-२७, रा. केडगाव देशमुखशेरी, ता. दौंड) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर स्वप्नील सुनिल शिंदे, मिथुन सुरेश मोरे, राजु सुरेश मोरे (सर्व रा. केडगाव स्टेशन ता. दौड, जि. पुणे) असे मारहाण करणाऱ्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी वैभव देशमुख यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैभव देशमुख हे खाजगी नोकरी करतात. शुक्रवारी दुपारी ते केडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोरून जात असताना आरोपी स्वप्नील शिंदे याने त्यांना अडवले. तू माझ्याकडे का बघतोस? असा जाब विचारत स्वप्नीलने वैभव यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

वाद वाढत गेल्यावर आरोपी स्वप्नील शिंदे याने रस्त्यावरील दगड उचलून वैभव यांच्या डोक्यात जोरात मारला. यावेळी स्वप्नीलसोबत असलेले त्याचे दोन मित्र मिथून मोरे आणि राजू मोरे यांनीही वैभव यांना घेरले. या तिघांनी मिळून वैभव यांना लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली आणि तुला बघून घेतो अशी धमकी देऊन तिथून पळ काढला.

याप्रकरणी जखमी वैभव देशमुख यांनी यवत पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी याप्रकरणी स्वप्नील शिंदे, मिथून मोरे आणि राजू मोरे या तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस हवालदार मेघराज जगताप करत आहेत.

# एमआयटी–एडीटी विद्यापीठाला डास्का मानांकन

## एआय व डेटा सायन्स अभ्यासक्रमांसाठी मिळाला आंतरराष्ट्रीय दर्जा; महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ

**पुणे, ता.०१ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाला (एमआयटी-एडीटी) डेटा सायन्स कौन्सिल ऑफ अमेरिका यांचे मानांकन प्राप्त झाले असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा सायन्स क्षेत्रातील उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या मानांकनासह विविध एआय व डेटा सायन्स अभ्यासक्रमांसाठी डास्का मान्यता मिळवणारे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरण्याचा मान एमआयटी-एडीटीला मिळाला आहे.

हे मानांकन ११ पदवी, ३ पदव्युत्तर तसेच पीएच.डी. स्तरावरील संगणक शास्त्र आणि अभियांत्रिकी / माहिती तंत्रज्ञान या शाखेतील अभ्यासक्रमांना प्रदान करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा ॲनालिटिक्स, क्लाऊड कॉम्प्युटिंग, सायबर सिक्युरिटी, ब्लॉकचेन आणि इंटेलिजंट सिस्टिम्स या आधुनिक डेटा सायन्स व एआयच्या मूलभूत तंत्रज्ञान क्षेत्रांचा यात समावेश आहे.

डास्का मानांकन जागतिक दर्जाच्या अभ्यासक्रम रचना, शैक्षणिक गुणवत्ता आणि उद्योगाभिमुखतेशी सुसंगतता सिद्ध करणाऱ्या संस्थांनाच प्रदान केले जाते. हे मानांकन डेटा-आधारित अर्थव्यवस्थेच्या बदलत्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासह शिक्षण देणाऱ्या जागतिक स्तरावरील संस्थांना बहाल केले जाते.

या मानांकनामुळे डास्काच्या वर्ल्ड डेटा सायन्स अँड एआय इनिशिएटिव्ह (डब्ल्यूडीएसएआय) अंतर्गत जागतिक उपक्रमांमध्ये सहभागीहोण्याचीसंधीविद्यापीठाला मिळणार असून, प्राध्यापक प्रशिक्षण, संशोधन सहकार्य आणि सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापनेस चालना मिळणार आहे.


एमआयटी- एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी विद्यापीठाच्या या जागतिक यशाबद्दल आनंद व्यक्त करताना म्हटले की, विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानवी मूल्यांचा समन्वय साधणारी शिक्षण व्यवस्था उभारण्याचा एमआयटी-एडीटी विद्यापीठाचा सातत्यपूर्ण प्रयत्न असतो. भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील कौशल्याधिष्ठित शिक्षण पुरविण्याचा आमचा मानस असून, डास्का मानांकनामुळे त्या प्रयत्नांना मोठे बळ मिळाले आहे.

विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी ही कामगिरी शैक्षणिक उत्कृष्टता आणि नवोपक्रमाच्या सातत्यपूर्ण वाटचालीचे प्रतीक असून, मिळालेले हे मानांकन सन्मानासोबतच जबाबदारी वाढविणारे देखील असल्याचे नमूद केले.

दरम्यान, या मानांकनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., एनईपी, रँकिंग व मानांकन अधिष्ठाता प्रा. डॉ. विरेंद्र शेटे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, डॉ. गणेश पाठक, डॉ. श्रद्धा फणसळकर आणि डॉ. राकेश सिद्धेश्वर यांचे विद्यापीठ व्यवस्थापनाकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

# पीएमआरडीए क्षेत्रातील 'घरकुल' अनुदानातील भेदभाव दूर करा; आमदार राहुल कुल यांची मागणी

**राहुलकुमार अवचट**



यवत, ता. ०१ : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नवनियुक्त आयुक्त अभिजीत चौधरी यांची आज आमदार राहुल कुल यांनी सदिच्छा भेट घेतली या भेटीदरम्यान दौंड विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे, विशेषतः प्रधानमंत्री आवास योजनेतील अनुदानातील तफावत आणि तालुक्यातील रस्ते विकास या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पीएमआरडीए क्षेत्रात सध्या शहरी भागासाठी २ लाख ५० हजार रुपये, तर ग्रामीण भागासाठी १ लाख २५ हजार रुपये अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे या मुद्द्यावर दौंडचे आमदार राहुल कुल यांनी आक्षेप नोंदवला. एकाच प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या लाभार्थ्यांमध्ये असा भेदभाव करणे अन्यायकारक आहे त्यामुळे शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही लाभार्थ्यांना समान अनुदान देण्यात यावे, अशी आग्रही मागणी आमदार राहुल कुल यांनी यावेळी केली. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-१ अंतर्गत ज्या लाभार्थ्यांचे अनुदान प्रशासकीय कारणांमुळे प्रलंबित आहे, ते तातडीने वितरित करण्यात यावे, अशा सूचना आमदार राहुल कुल यांनी दिल्या. तसेच योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (डीपीआर) तयार करण्याची कार्यवाही त्वरित सुरू करावी, जेणेकरून जास्तीत जास्त गरजू नागरिकांना स्वतःच्या हक्काचे घर मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

दौंड तालुक्यात PMRDA च्या माध्यमातून अनेक रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांचा आढावा घेत आमदार राहुल कुल यांनी ही कामे तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांना दिल्या. रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण झाल्यास नागरिकांची वाहतुकीची मोठी समस्या सुटेल, याकडे आमदार राहुल कुल यांनी प्रशासनाचे लक्षवेधले. दरम्यान, या सर्व प्रलंबित मागण्यांवर आयुक्त अभिजीत चौधरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, जनहिताचे हे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे.

# निवडणुकीच्या कामात हलगर्जीपणा भोवला; शिक्षकावर सासवड पोलिसांत गुन्हा दाखल




**सासवड, ता. १ :** भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सोपवण्यात आलेली कायदेशीर कर्तव्ये पार पाडण्यास टाळाटाळ करणाऱ्या एका शिक्षकावर सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक कामाकडे दुर्लक्ष करणे आणि वारंवार बैठकींना गैरहजर राहणे या कारणास्तव ही कारवाई करण्यात आली आहे. या घटनेने प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

आनंद महादेव बंडगर, शिक्षक, ए.सी. हुंडकरी, अहिल्यादेवी माध्यमीक शाळा जेजुरी ता. पुरंदर जि.पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या शिक्षकाचे नाव आहे. याप्रकरणी पुरंदरच्या नायब तहसीलदार (निवडणूक विभाग) श्रीमती शुभांगी नारायण गोंजारे यांनी सासवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेजुरी येथील अहिल्यादेवी माध्यमिक शाळेतील शिक्षक आनंद बंडगर यांची नियुक्ती सप्टेंबर २०२५ पासून मतदान केंद्र क्रमांक २२९ साठी 'मतदान केंद्रस्तरीय अधिकारी' (इडज) म्हणून करण्यात आली होती. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी बीएलओ यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, आरोपी आनंद बंडगर यांनी आपल्याला सोपवलेले हे कायदेशीर कर्तव्य जाणूनबुजून पार पाडले नाही.

यासंदर्भात तहसील कार्यालयाने आयोजित केलेल्या महत्त्वाच्या बैठकींनाही ते वारंवार गैरहजर राहिले. प्रशासनाने वेळोवेळी सूचना देऊनही त्यांनी आपल्या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे तपासात समोर आले आहे.

दरम्यान, शासकीय आदेशाचे उल्लंघन आणि निवडणूक कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी सासवड पोलिसांनी ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड करत आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# उरुळी कांचन येथे गॅस ग्राहकांची उघड लूट; पावतीवर ९१६ अन् खिशातून जातात ९५०

## उरलेले ३४ रुपये जातायत कोणाच्या घशात?

**उरुळी कांचन, ता. १ :** घरगुती वापरासाठीचा (एलपीजी) गॅस सिलिंडर ग्राहकांना शासनाने निर्धारित केलेल्या किमतीला म्हणजेच ९१६ रुपयांना घरपोच देणे गॅस एजन्सींना बंधनकारक आहे. असे असतानाही उरुळी कांचन (ता. हवेली) येथील सुरानंद एचपी गॅस एजन्सीच्या काही वाहकाकडून ग्राहकांकडून मात्र ९१६ रुपयांचा सिलेंडर 'घरपोच शुल्क (होम डिलिव्हरी चार्ज) आकारणी'च्या नावाखाली ग्राहकांना ९५० रुपयांना विकत घ्यावा लागत असल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला आहे.

दैनंदिन महागाईने होरपळणाऱ्या सर्वसामान्यांच्या खिशाला आता गॅस वितरकांकडून 'अघोषित' कात्री लावली जात आहे. गॅस सिलेंडरच्या



किमतीबाबत व घरपोच नियमाबाबत अचूक माहिती नसल्याने गॅस वितरण एजन्सींनी ग्राहकांना घरपोच सिलेंडर देण्यासाठी नेमलेले मध्यस्थच नागरिकांकडून 'घरपोच शुल्क (होम डिलिव्हरी चार्ज) आकारणी'च्या नावाखाली बेकायदा वसूली करत असल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे या वाढीव ३४ रुपयांच्या वसुलीमुळे नागरिक संतप्त झाले असून, ही कमिशनखोरी आहे की रशिया-युक्रेन युद्धाच्या नावाखाली सुरू असलेली लूट, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन येथील सुरानंद एचपी गॅस एजन्सीचे डिलिव्हरी बॉईज सिलेंडर घरपोच देताना पावतीवरील किमतीपेक्षा ३० रुपये जास्त मागत आहेत. ग्राहकाने विचारणा केल्यास गाडीभाडे वाढले आहे किंवा मागूनच रेट वाढून आले आहेत अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. प्रत्यक्षात गॅसच्या पावतीवर सर्व टॅक्स आणि डिलिव्हरी चार्जेस समाविष्ट असतानाही ९५० रुपये घेतल्याने ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर युद्धाचा परिणाम इंधन दरांवर होत असला, तरी अधिकृत दर वाढल्याशिवाय पावतीपेक्षा जास्त पैसे घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. जर पावती ९१६ रुपयांची आहे, तर वरचे ३४ रुपये कोणाच्या खिशात जात आहेत? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. प्रत्येक सिलेंडरमागे होणारी ही छोटी वाटणारी रक्कम हजारो ग्राहकांचा विचार करता लाखो रुपयांच्या घरात जाते. ही एक प्रकारची संघटित 'कमिशनखोरी' असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे.

दरम्यान, पूर्व हवेलीतील उरुळी कांचन व परिसरातील अनेक नागरिकांनी या लुटीबाबत संताप व्यक्त केला आहे. आधीच महागाईने कंबरडे मोडले असताना, अशा प्रकारे उघडपणे होणारी लूट प्रशासनाने थांबवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## ठाकरे-पवारांच्या मदतीला फडणवीस

**मुंबई, ता. १ :** कट्टर राजकीय विरोधक असलेल्या ठाकरेसेना आणि पवारांच्या राष्ट्रवादीच्या मदतीला मुख्यमंत्री फडणवीस धावून गेल्याची चर्चा रंगलीय. राज्यात पुन्हा एकदा शिंदेसेनेकडून ठाकरेसेना आणि पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदारांना गळाला लावत ऑपरेशन टायगर राबवण्याच्या हालचालींची चर्चा रंगली होती. मात्र ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु असताना पवार आणि ठाकरेसेनेच्या मदतीला मुख्यमंत्री फडणवीस धावले आणि त्यांनी शिंदेसेनेच्या ऑपरेशन टायगरला ब्रेक लावल्याची माहिती सुत्रांनी दिलीय. आदित्य ठाकरे आणि पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मोहित कँबोजच्या मुलीच्या वाढदिवसाला नुकतीच हजेरी लावली. या कार्यक्रमानंतर अवघ्या २४ तासांच्या आतच शिंदेंनी फडणवीसांची भेट घेतली. आणि याच भेटीत फडणवीसांनी ठाकरेसेना आणि पवारांची राष्ट्रवादी फोडण्यास नकार देत ऑपरेशन टायगरला ब्रेक लावल्याची माहिती सुत्रांनी दिलीय.

प्राईम लाईफ



## घरगुती फेस पॅकने कपाळावरील सुरकुत्या दूर करा!

वृद्धत्वामुळे आणि त्वचेची योग्य काळजी न घेतल्याने त्याचा परिणाम चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येतो. यामुळे चेहऱ्याची चमक कमी होते आणि त्वचा सैल होऊ लागते. त्याचबरोबर अनेक महिलांना कपाळावर सुरकुत्या येण्याची समस्या येऊ लागते. कपाळावर उमटणाऱ्या या रेषा सौंदर्य आणि डागाप्रमाणे काम करतात. अशा स्थितीत, जर तुम्ही देखील यामुळे त्रस्त असाल तर तुमच्यासाठी ३ खास घरगुती फेसपॅक घेऊन आलो आहोत. हे लावल्याने तुम्ही कपाळावर पडलेल्या या सुरकुत्यापासून मुक्त व्हाल आणि चेहऱ्यावर चमक आणण्यास मदत होईल.

१) कोको पावडर आणि ऑलिव्ह ऑईल फेसपॅक : कपाळावर दिसणाऱ्या या रेषा दूर करण्यासाठी तुम्ही कोको पावडर आणि ऑलिव्ह ऑईलचा फेस पॅक लावू शकता. यासाठी १-१ टेबलस्पून कोको पावडर आणि ऑलिव्ह ऑईल एका वाडग्यात मिसळा. मिश्रणाची एक गुळगुळीत पेस्ट बनवा आणि प्रभावित भागात किंवा संपूर्ण चेहऱ्यावर लावा. ते २० मिनिटे तसेच राहू द्या. नंतर ते स्वच्छ पाण्याने धुवा. काही दिवस सतत लागू केल्यानंतर तुम्हाला फरक जाणवेल


२) ऑलिव्ह ऑईल आणि मध फेस पॅक : कपाळावर दिसणाऱ्या रेषांपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही ऑलिव्ह ऑईल आणि मध फेस पॅक वापरून पाहू शकता. हे तुमच्या कपाळावरील वाढलेल्या रेषा काढून चेहऱ्यावर चमक आणण्यास मदत करेल. यासाठी एका वाडग्यात १-१ चमचा ऑलिव्ह ऑईल आणि मध मिसळा. दोन्ही चांगले मिसळा आणि झोपण्यापूर्वी कपाळावर किंवा संपूर्ण चेहऱ्यावर लावा. रात्रभर तसेच राहू द्या.दुसऱ्या दिवशी सकाळी स्वच्छ पाण्याने चेहरा स्वच्छ करा. हा फेस पॅक आठवड्यातून २ ते ३ वेळा लावा. तुम्हाला काही दिवसात फरक दिसू लागेल.

३) गाजर आणि अंड्याचा फेस पॅक : गाजरात असलेले बीटा कॅरोटीन, आयोडीन नावाचे घटक सुरकुत्या कमी करण्यासाठी फायदेशीर मानले जातात. यासोबतच अंड्यांमध्ये असलेले पोषक घटक सैल त्वचा घट्ट करण्यास मदत करतात. अशा परिस्थितीत, कपाळावर उमटलेल्या या रेषा आणि सुरकुत्या काढून टाकण्यासाठी तुम्ही गाजर आणि अंड्याचा फेस पॅक लावू शकता. यासाठी एका वाडग्यात १ अंड्याचे पांढरे आणि किसलेले गाजर मिसळून चेहऱ्यावर २० मिनिटे लावा. नंतर ते स्वच्छ पाण्याने स्वच्छ करा. चांगले आणि लवकर परिणाम मिळविण्यासाठी, आठवड्यातून दोनदा ह्या फेस पॅक चा वापर करा.

# रुपाली चाकणकर चौकशीला गैरहजर का? सुषमा अंधारेंचा थेट सवाल

**मुंबई, ता. १ :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाचे पडसाद आता थेट राज्याच्या राजकारणात उमटताना दिसत आहेत. या प्रकरणाशी संबंध असल्याच्या आरोपांमुळे आधीच पदांचा राजीनामा द्यावा लागलेल्या रुपाली चाकणकर यांच्यावरील अडचणी आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. एसआयटीकडून चौकशीसाठी त्यांना समन्स पाठवण्यात आल्याची चर्चा असताना त्या चौकशीसाठी हजर राहिल्या नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आक्रमक भूमिका घेत चाकणकर यांच्यावर जोरदार टीका



केली. त्यांनी केवळ चाकणकरांवरच नव्हे, तर या प्रकरणातील कथित इतर व्यक्तींवरही गंभीर आरोप करत संपूर्ण प्रकरण हे मोठ्या जाळ्याचा भाग असल्याचा दावा केला.

अंधारे यांनी म्हटले की, काही कार्यकर्ते केवळ सोशल मीडियावर टीका करून विषय भरकटवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र या प्रकरणात अनेक प्रभावशाली व्यक्तींचे संबंध उघड होत असल्याचा त्यांनी आरोप केला. त्यांनी सिन्नर एमआयडीसीचे चेअरमन नामकर्ण आवारे यांचे नाव घेत, ते या साखळीतील महत्त्वाची कडी असल्याचा दावा केला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, जगदंब पतसंस्था आणि शिवनिका ट्रस्टसारख्या संस्थांमधून काही व्यक्तींमध्ये आर्थिक आणि व्यावसायिक संबंध होते. या माध्यमातून अशोक खरात आणि संबंधित व्यक्तींमध्ये जवळीक निर्माण झाली असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच काही राजकीय नेत्यांचेही अप्रत्यक्ष संबंध असल्याचा इशारा त्यांनी दिला.

या सगळ्या आरोपांमुळे खरात प्रकरण केवळ एका गुन्ह्यापुरते मर्यादित न राहता, संभाव्य रॅकेट किंवा नेटवर्कच्या दिशेने जात असल्याची चर्चा रंगली आहे. एसआयटीच्या तपासात पुढे काय निष्पन्न होते, यावर अनेक राजकीय भवितव्य अवलंबून असल्याचे चित्र आहे.

## भोंदू खरातच्या जाळ्यात 'करोडपती' भक्त

**नाशिक, ता. १ :** नाशिकमधील स्वयंघोषित भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण आता एका नव्या वळणावर येऊन ठेपले आहे. एसआयटीच्या तपासात समोर आलेली माहिती कोणत्याही क्राईम थ्रिलरपेक्षा कमी नसून अशोक खरात हा श्रीमंतांच्या कमकुवत मानसिकतेचा फायदा घ्यायचा. त्याच्या भक्तगणांमध्ये सामान्य माणसाला स्थान नव्हते; तो केवळ बडे सनदी अधिकारी, राजकारणी आणि उद्योगपतींना लक्ष करत होता.

विशेष म्हणजे, अमावस्या किंवा पौर्णिमेला 'आऊटडोअर व्हिजिट'साठी खरात तब्बल ५ लाख रुपये घेत असे. पुण्याच्या एका 'करोडपती' भक्ताला तर त्याने चक्क ९० लाखांची लक्झरी कार स्वतःच्या नावावर खरेदी करायला भाग पाडले गेल्याचे तपासात समोर आले आहे.

खरातच्या कॅनडा कॉर्नर येथील आलिशान कार्यालयात तांत्रिक विधींच्या नावाखाली नको ते कृत्य सुरु होते. एसआयटीने नुकतेच पीडित महिलांना सोबत घेऊन या ठिकाणी 'सीन रिक्रिएशन' केले.

तपासात तिथे काही संशयास्पद औषधे आणि मौल्यवान रत्ने सापडली आहेत. अशोक खरातची पोलीस कोठडी उद्या, १ एप्रिल रोजी संपत आहे. आयपीएस तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील पथक आता या भोंदूच्या साम्राज्याचा शेवट करण्यासाठी कोणते ठोस पुरावे न्यायालयात सादर करते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी अश्विनी भिडे

**मुंबई, ता. ३१ :** मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदावर अश्विनी भिडे यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रशासनात मोठा बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयानंतर मेट्रो वूमन म्हणून ओळख असलेल्या भिडे यांच्यावर मुंबईची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्या आज आयुक्तपदाचा पदभार स्वीकारणार आहेत.

अश्विनी भिडे या १९९५ बॅचच्या आयएएस अधिकारी असून त्यांना सुमारे २५ वर्षांचा प्रशासकीय अनुभव आहे. यापूर्वी त्या मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या कामाचा वेग, निर्णयक्षमता आणि कडक कार्यशैली यासाठी त्या ओळखल्या जातात. त्यामुळेच त्यांच्याकडून मुंबई महापालिकेच्या कामकाजात गती येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुंबई महापालिकेचे विद्यमान आयुक्त भूषण गगराणी आज निवृत्त होत असून त्यांच्या जागी भिडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना आयुक्तपदाचा ३ वर्षांचा कार्यकाळ मिळणार आहे. यापूर्वी त्यांनी बीएमसीमध्ये अतिरिक्त आयुक्त म्हणून काम पाहिले असून शहरातील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये त्यांनी भूमिका बजावली आहे. मुंबईतील पहिल्या अंडरग्राऊंड मेट्रो ३ प्रकल्पाला मार्गी लावण्यात भिडे यांचे मोठे योगदान मानले जाते. कठीण परिस्थितीत हा प्रकल्प पुढे नेण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. त्यामुळे मेट्रो वूमन ही त्यांची ओळख अधिक मजबूत झाली आहे. आता मुंबईसारख्या मोठ्या शहराची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आल्याने प्रशासन अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा मोठा पक्ष फोडणार?

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या दिल्ली दौऱ्यानंतर हालचालींना वेग

**मुंबई, ता. १ :** महाराष्ट्राच्या राजकारणातील फोडाफोडीचे सत्र अद्याप संपलेले नाही, उलट ते आता एका अत्यंत खालच्या आणि निर्णायक वळणावर येऊन ठेपले आहे. आता 'ऑपरेशन तुतारी' चर्चेत आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रडारवर आता शरद पवारांचे खासदार असून, पडद्यामागे अत्यंत वेगाने हालचाली सुरू आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राज्याच्या राजकारणातील आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी दोन्ही सत्ताधारी गटांना जास्तीत जास्त खासदारांचे बळ हवे असल्यामुळे फोडाफोडीचे राजकारण करण्यात येणार आहे.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडून राज्यात सत्तांतर घडवले



होते. आता तोच 'शिंदे पॅटर्न' शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर आजमावण्याची तयारी सुरू असल्याचे समजते. दिल्ली दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर या हालचालींना वेग आला आहे.

विशेष म्हणजे, शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी केलेल्या एका सूचक विधानामुळे विरोधकांच्या गोटातून काही मोठे मासे गळाला लागणार का? या चर्चेला उधाण आले आहे.

शरद पवारांच्या गटातील काही खासदारांना विविध आमिषे आणि ऑफर्स देऊन आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे एका ज्येष्ठ नेत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर मान्य केले आहे.

## पुण्यात अवकाळी पावसाचे सावट

**पुणे, ता. १ :** मार्च महिन्याच्या अखेरच्या दिवशी पुणेकर उकाड्याने हैराण झाले असतानाच हवामानाने अचानक कूस बदलली आहे. भारतीय हवामान विभागाने पुणे जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला असून शहरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता वर्तवली आहे. सोमवारी दुपारनंतर पाषाण, कोथरूड आणि हिंजवडी परिसरात झालेल्या पावसाने आधीच वातावरणात बदल घडवून आणला असून आज पावसाचा जोर अधिक राहण्याचा अंदाज आहे.




आज पुण्यातील कमाल तापमान ३५ ते ३७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता असून किमान तापमान २२ अंशांपर्यंत राहील. सकाळपासूनच शहरात ढगाळ वातावरण पाहायला मिळत असून हवेतील आर्द्रतेचे प्रमाण ४० ते ५० टक्क्यांच्या दरम्यान आहे. अरबी समुद्रावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. दुपारनंतर विजांच्या कडकडाटासह ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहू शकतात.

हवामान तज्ज्ञांच्या मते, हा अवकाळी पाऊस शेतीसाठी चिंतेचा विषय ठरू शकतो. विशेषतः द्राक्ष, आंबा आणि काढणीला आलेल्या पिकांना या वादळी पावसाचा मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या २४ तासांत पाषाणमध्ये सर्वाधिक ४६ मिमी पावसाची नोंद झाली असून लोहगाव आणि शिवाजीनगर परिसरातही हलका ते मध्यम पाऊस झाला आहे.

## डॉ. ममता शिवतारे यांनी स्वतःची किडनी देऊन वडिलांचा वाचविला जीव

**पुरंदर, ता. १ :** पुरंदर तालुक्यातून समोर आलेली एक घटना बाप-लेक नात्याची खरी ताकद आणि भावनिक उंची दाखवून देते.विजय शिवतारे यांच्या आयुष्याला त्यांच्या लेकीने अक्षरशः नवा श्वास दिला आहे. गेल्या काही महिन्यांपासून गंभीर किडनी विकाराने त्रस्त असलेल्या शिवतारे यांची प्रकृती झपाट्याने खालावत होती. नियमित डायलिसिस सुरू असतानाही स्थिती नियंत्रणात येत नव्हती आणि शेवटी किडनी ट्रान्सप्लांट हाच एकमेव पर्याय उरला.



याच निर्णायक क्षणी त्यांची मुलगी डॉक्टर ममता शिवतारे पुढे सरसावली. डॉक्टर असलेल्या ममतांनी केवळ वैद्यकीय दृष्टिकोनातून नाही, तर मुलगी म्हणून जबाबदारी स्वीकारत स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. मुंबईतील एका नामांकित रुग्णालयात पार पडलेली ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली असून सध्या दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याची माहिती समोर येत आहे.

या घटनेची पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. भारतात दरवर्षी हजारो रुग्णांना किडनी ट्रान्सप्लांटची गरज असते, पण योग्य दाते वेळेत मिळत नाहीत. अशा परिस्थितीत कुटुंबातील सदस्यच पुढे येतात. ममता यांनी घेतलेला निर्णय हा केवळ वैद्यकीय मदत नाही, तर एक मोठा सामाजिक संदेश आहे.

पुरंदरच्या या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात भावनिक प्रतिक्रिया उमटल्या आहेत. ममता शिवतारे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या कृतीने समाजाला एक सकारात्मक दिशा दिली आहे नात्यांमध्ये प्रेम आणि जबाबदारी असेल, तर अशक्य काहीच नाही.

# लोणी काळभोर मधील व्यापारी सायबर फसवणुकीचा बळी

## अंदमान टूरचे स्वप्न दाखवून भामट्यांनी घातला ६ लाखांचा गंडा

**लोणी काळभोर, ता. १ :** अंदमान-निकोबार सहलीचे आमिष दाखवत बनावट ट्रॅव्हल एजन्सीच्या नावाखाली लोणी काळभोर (ता. हवेली) येथील एका व्यापाऱ्याची तब्बल ६ लाख ६ हजार ४०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्यांच्या विरुद्ध लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुल उत्तम काळभोर (वय ४५, रा. वाकवस्ती, लोणी काळभोर) असे फसणवुक झालेल्या व्यापऱ्याचे नाव आहे. राहुल काळभोर हे महिलांच्या साहित्याचे दुकान चालवतात. अंदमान-निकोबार येथे मित्रांसह सहलीचे नियोजन करत असताना त्यांनी गुगलवर ट्रॅव्हल एजन्सींचा शोध घेतला. यावेळी त्यांना Big Goal Travel या नावाची वेबसाईट आणि सोशल मीडियावरील माहिती मिळाली. अमर वर्मा नावाच्या व्यक्तीने मोबाईल व व्हॉट्सॲपद्वारे काळभोर यांच्याशी संपर्क साधून फ्लाइट व हॉटेल बुकिंग करण्याचे आश्वासन दिले. विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी संबंधिताने कंपनीचे लायसन्स, जीएसटी क्रमांक तसेच इंस्टाग्राम अकाउंटची माहिती पाठवली. कागदपत्रे व ऑनलाईन उपस्थिती पाहून फिर्यादी व त्यांच्या मित्रांचा विश्वास बसला. आरोपींनी दिलेल्या सूचनांनुसार २ मार्च ते १८ मार्च २० २६ या कालावधीत काळभोर यांनी युनियन बँक व एचडीएफसी बँकेतील वेगवेगळ्या खात्यांमधून पैसे ट्रान्सफर केले. फ्लाइट व हॉटेल बुकिंगच्या नावाखाली एकूण ६ लाख ६ हजार ४०० रुपये आरोपींच्या खात्यांमध्ये जमा करण्यात आले.




सुरुवातीला आरोपींकडून पुणे ते श्री विजयपुरम (अंदमान) या प्रवासासाठी फ्लाइटचा पीएनआर क्रमांक आणि हॉटेल बुकिंगची माहिती पाठवण्यात आली. मात्र परतीच्या प्रवासाची माहिती देण्यास आरोपी टाळाटाळ करू लागले. संशय आल्याने काळभोर यांनी संबंधित फ्लाइटची तपासणी केली असता ती बुकिंग रद्द झाल्याचे समोर आले. तसेच हॉटेलशी संपर्क साधल्यावर बुकिंग झाले असले तरी पेमेंट न झाल्याचे स्पष्ट झाले. आरोपींनी विविध कारणे देत वेळकाढूपणा सुरू केला आणि अखेर संपर्कच तोडला.

फिर्यादी राहुल काळभोर यांना आपली ऑनलाईन फसवणूक झाल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी सायबर पोर्टलवर तक्रार नोंदवली. त्यानुसार लोणी काळभोर पोलिस ठाण्यात मोबाईल नंबर, व्हॉट्सॲप अकाउंट, वेबसाईट लिंक व संबंधित बँक खात्यांच्या आधारे आरोपींविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (ड) तसेच भारतीय न्याय संहिता २० २३ चे कलम ३१८ (४) व ३१९ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ऑनलाईन टूर बुकिंग करताना घ्या काळजी

- अनोळखी एजन्सीकडे थेट पैसे ट्रान्सफर करू नयेत
- अधिकृत वेबसाईट व कंपनीचा प्रत्यक्ष पत्ता तपासावा
- फक्त व्हॉट्सॲपवरून मिळालेल्या कागदपत्रांवर विश्वास ठेवू नये
- बुकिंगपूर्वी एजन्सीचे ग्राहक अभिप्राय तपासावेत